**नियमित फौजदारी खटला-१०४१/२०२३**

**नि.१४/क, महा.सरकार / प्रशांत हेगडे**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी.

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – आशिष प्रविण लोखंडे

वय - २४

धंदा - शिक्षण

राहणार - विचारेमाळ, सदरबाजार, कोल्हापूर

<u>**सरतपास सरकार तर्फे सरकारी वकील श्री.ए.एन.डोईफोडे**</u>

दि.०६/०७/२०२३ रोजी पोलिसांनी मला घटनास्थळावर बोलविले नव्हते. पोलिसांनी माझ्या समक्ष कोणताही घटनास्थळ व जप्ती पंचनामा केलेला नव्हता. मला आता दि.०६/०७/२०२३ रोजीचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. सदर पंचनामा माझ्या समक्ष झालेला नव्हता परंतू अ.क्र.२ वर माझी सही आहे. सदर पंचनाम्यास सही ओळखण्यापुरते **नि.१५** देण्यात येत आहे.

(प्रस्तुत साक्षीदार हा वर नमुद पंचनाम्यावरील आपली पंच म्हणून सही ओळखतो,परंतू सदर पंचनामा त्याच्या समक्ष झालेला नाही असे नमुद करतो. म्हणून सरकारी वकीलांनी सत्य वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणेसाठी त्याचा उलटतपास घेणेची परवानगी मागीतली. एकंदरी हकीकतीचा विचार करता, सदर परवानगी मंजूर करण्यात आली )

<u>**उलटतपास सरकारी विधिज्ञांतर्फे सुरु**</u>

२. हे म्हणणे खरे नाही, दि.०६/०७/२०२३ रोजी शाहुपूरी पोलिसांनी कोल्हापूर सदरबाजार चौक ते कदमवाडीकडे जाणारे रोडवरील आण्णाभाऊ साठे समाज मंदीराचे आतील बोळामध्ये पंचनाम्यासाठी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा माझ्या समक्ष केला म्हणून मी त्यावर पंच

म्हणून सही केलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी घटनास्थळावरुन एक काठी माझ्या समक्ष जप्त केली.  सदर पंचनाम्यात पंच म्हणून माझे नाव का नमुद केले आहे याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही, मी आरोपीस वाचविणेसाठी सत्यवस्तुस्थिती न्यायालयासमोर सांगत नाही.

**आरोपी तर्फे विधिज्ञ डी.एन.गावडे यांचे मार्फत सुरु ..**

२. नाकारले.

फेरतपास नाही.

जबाब माझ्या समक्ष नोंदविला.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**सही/-**

**(श्रीमती एम. डी. कश्यप)**

**मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर**

**दिनांक-२८/०८/२०२६**

**नियमित फौजदारी खटला-१०४१/२०२३**

**नि.१७/क, महा.सरकार / प्रशांत हेगडे**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी.

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – शोभा प्रशांत हेगडे

वय - ३७

धंदा - घरकाम,

राहणार - विचारेमाळ,कोल्हापूर

**<u>सरतपास सरकार तर्फे सरकारी वकील श्री.ए.एन.डोईफोडे</u>**

आरोपी हा माझा पती आहे. दि.०५/०७/२०२३ रोजी आरोपीचे व माझे किरकोळ भांडण व बाचाबाची झाली होती. भांडण झालेनंतरही मी आरोपी सोबतच राहत आहे. मला आता दि.०६/०७/२०२३ रोजीची सदर फिर्याद दाखविण्यात आला. सदर फिर्यादीमधील मजकूराबाबत माहिती नाही. सदर फिर्यादीवर असलेली सही ही माझी आहे. सदर फिर्यादीस सही ओळखणेपुरते **<u>नि.१८</u>** आहे.

( प्रस्तुत फिर्यादीने फिर्याद दिलेचे मान्य करुन तिच्यावर आपली सही ओळखली आहे. परंतू ती घटनेबाबत तसेच फिर्यादीमधील मजकूराबाबत माहिती नाही असे सांगत आहे. म्हणून सरकारी वकीलांनी सत्य वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणेसाठी तिचा उलटतपास घेणेची परवानगी मागीतली. एकंदरी हकीकतीचा विचार करता, भारतीय साक्ष अधिनियम कलम १५७ प्रमाणे साक्षीदाराचा उलटपास घेण्यास अभियोग पक्षास परवानगी मंजूर करण्यात येत आहे.)

**<u>सरकारी पक्षातर्फे उलटतपास</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.०५/०७/२०२३ रोजी आरोपीने "तु या घरात रहायचे नाही." असे म्हणून शिवीगाळ करुन काठीने मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या डाव्या हाताला आणि करंगळीला जखम झाली होती.

३. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या फिर्यादीतील आधोरेकित **भाग अ** मधील मजकूर मी पोलिसांना सांगीतला होता. माझ्या फिर्यादीतील आधोरेकित **भाग अ** मध्ये काय लिहिलेला

आहे, याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही सदरच्या आधोरेकित **भाग अ** प्रमाणे मी पोलिसांना सांगीतले मुळे तसा मजकूर माझ्या जबाबात लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविणेसाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी तर्फे विधिज्ञ डी.एन.गावडे यांचे मार्फत सुरु...**

५. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीची व माझी न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आरोपीविरुध्द माझी कोणतीही तक्रार नाही. मला खटला पुढे चालवावयाचा नाही तसेच इतर साक्षीदार तपासवायाचे नाही.

६. फेरतपास नाही.

जबाब माझ्या समक्ष नोंदविला.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**सही/-**
**(श्रीमती एम. डी. कश्यप)**
**मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर**

**दिनांक-२८/०८/२०२६**